रे.दि.मु.क्रं.७६/२०१६

नझीर वि.अफझल

नि.क्रं. १२८

# आदेश

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्रं १० ने दाखल करुन नमूद केले की, कैफीयत तयार करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे वेळेत उपलब्ध् न झाल्याने विहीत मुदतीत कैफीयत देता आली नाही. त्यास झालेला ४० दिवसांचा उशीर रद्द होऊन कैफीयत पटलावर घ्यावी अशी विनंती करण्यात येते.

वादीने दिलेल्या म्हणण्यानुसार दोन स्वतंत्र अर्ज देऊन कैफीयत दिली गेलेली नाही. अर्जात नमूद कारण पुरेसे नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

प्रतिवादी क्रं. १० यास नि.क्रं. ११४ प्रमाणे दावासमन्स काढण्यात आले. तो दि.२५/२/२०२५ रोजी या प्रकरणी हजर झाला. मात्र त्याच्यावर बजावणी कधी झाली याचा पोस्टाचा पुरावा दिसून येत नाही. त्यामुळे दि.२५/०२/२०२५ रोजी तो हजर झाल्यानंतर पुढे कमीत कमी ३० व जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफीयत दाखल करणे आवश्यक होते. सदर प्रतिवादीचे ९० दिवस हे दि. २६/०६/२०२५ रोजी संपतात कारण दि. ०९/०५/२०२५ ते दि. ०८/०६/२०२५ या काळात न्यायालयास उन्हाळी सुट्टया होत्या.त्यामुळे सुट्टीचे दिवस वगळणे गरजेचे आहे.

त्यामुळे मुळात कैफीयत देण्यास विलंब झालेला नाही. म्हणून अर्ज मंजूर करण्यात येतो.

स्वाक्षरीत/-

( एस.एन.सरडे )

दि.१९/०६/२०२५ दिवाणी न्यायाधीश व.स्तर,अहमदपूर.